लोकमत

# ‘साइबर शिक्षा फोर साइबर सुरक्षा’ अंतर्गत दौंडच्या पायल ढेकणे यांनी केली जनजागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

**दौंड :** दौंड येथील पायल ढेकणे आणि किरण मुण्डेकर यांनी विद्यार्थ्यांसाठी सायबर जनजागृती कार्यक्रमात मोलाचे मार्गदर्शन केले. बारामती येथील विद्या प्रतिष्ठान कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, क्विक हेल फाउंडेशन यांच्या विद्यमाने आयोजित ‘साइबर शिक्षा फोर साइबर सुरक्षा’ उपक्रमांतर्गत कार्यक्रम बारामतीत आर. एन. अग्रवाल तांत्रिक महाविद्यालयात पार पडला.

**सायबर वॉरियर्स पायल राजू ढेकणे आणि किरण मुण्डेकर यांनी सायबर सुरक्षेविषयी माहितीपूर्ण सादरीकरण केले**

विद्या प्रतिष्ठानच्या सायबर वॉरियर्स पायल राजू ढेकणे आणि किरण मुण्डेकर यांनी सायबर सुरक्षेविषयी माहितीपूर्ण सादरीकरण केले. यामध्ये त्यांनी “सायबर फ्रॉड म्हणजे काय ?”, “त्यापासून बचाव कसा करावा?” आणि “डिजिटल माध्यमात सुरक्षित कसे राहावे ?” यासंबंधी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात दाखविलेली सर्जनशीलता आणि उत्स्फूर्त सहभाग यामुळे हा कार्यक्रम प्रेरणादायी ठरला, असे महाविद्यालयातील शिक्षकांनी सांगितले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली.